**Covid-19**
**Top Most Priority**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१ E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५,
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
४) भारत सरकार,गृह मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील आदेश क्र. ४०-३/२०२० डी. दि. २४/०३/२०२०

---

क्र.जि.आ.व्य/कोरोना विषाणू/ २४१ /२०२०.
पुणे दिनांक :- ३१/०३/२०२०.

**विषय** :- कोरोना विषाणू (कोव्हीड १९)चा प्रादूर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपायायोजना करणेसाठी या कार्यालयामार्फत ३१/०३/२०२० पर्यतचे सर्व मनाई आदेश व परिपत्रकातील सुचना पुढील आदेशापर्यत सुरु ठेवणेबाबत

**संदर्भ** :- १) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३ (१) अन्वये सर्व धार्मिक प्रार्थनास्थळ सुरु ठेवणेबाबतचा आदेश क्र. जि.आ.व्य/कावि/१६९/२०२० दि. २४/०३/२०२०
२) बाजास समितीच्या आवारातील पोलीस बंदोबस्त क्र. जि.आ.व्य/कावि/१६२/२०२० दि. २३/०३/२०२०
३) पुणे जिल्हयातील दुय्यम निबंधक कार्यालय बंद ठेवणेबाबत क्र. आ.व्य.प्र. कक्ष/कावि/१५७/२०२० दि. २३/०३/२०२०
४) पुणे जिल्हयातील सर्व परमिटरुम, बियरबार व इतर आस्थापना बंद ठेवणेबाबत आदेश क्र. क्र. जि.आ.व्य/कावि/४२७/२०२० दि. २०/०३/२०२०
५) प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड यांचेकडील वाहन परवाना व वाहन नोंदणी न करणेबाबत आदेश क्र. जि.आ.व्य/कावि/१३२/२०२० दि. १७/०३/२०२०
६) पुणे जिल्हयातील लाईव्ह ऑर्केस्ट्रा, डिस्को व पब बंद करणेबाबत क्र. जि.आ.व्य/कावि/१३०/२०२० दि. १६/०३/२०२०
७) पुणे जिल्हयातील तरण तलाव, चित्रपट गृहे, नाटय गृहे, कलार्केद्र , म्युझियम इ. आस्थापना बंद करणेबाबत आदेश जि.आ.व्य/कावि/१२८/२०२० दि. १६/०३/२०२०
८) पुणे जिल्हयातील शैक्षणिक संस्था, आस्थापना बंद ठेवणेबाबत आदेश क्र. जि.आ.व्य/कोरोना विषाणू/१२७/२०२० दि. १६/०३/२०
९) पुणे जिल्हयातील सर्व सरकारी व खाजगी शाळा महाविद्यालये, आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांचे आस्थापनेवरील शिक्षण संस्था बंद ठेवणेबाबत आदेश क्र. कक्ष/कावि/ ४१८/२०२०२० पुणे दि. १५/०३/२०२०
१०) सर्व शॉपीग मॉल मधील दुकाने व आस्थापना (अत्यावश्यक किराना सामान ) (ग्रासरी, दूध, भाजीपाला, व अन्य जिवनावश्यक वस्तु व औषधालय केमिस्ट शॉप वगळून) आदेश क्र. आ.व्या.प्र.कक्ष/कावि/१२३/२०२० दि. १५/०३/२०२०
११) उद्योग आस्थापनामध्ये आय.टी./ सॉफटवेअर/इन्फरमेशन टेक्नोलॉजी/ इन्याबल सर्विसेस सेवा आणि इतर उद्योग क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांना निवासस्थानातून त्यांचे कार्यलयीन कामकाज देणेबाबत आदेश आ.व्या.प्र. कक्ष/कावि/१२२/२०२० दि. १५/०३/२०२०

## आदेश

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

पुणे जिल्हयामध्ये कोरोना विषाणू (कोव्हीड १९) या संसर्गजन्य आजार पसरला असून त्याचा प्रादूर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच भारत सरकार,गृह मंत्रालय यांचेकडील आदेश क्र. ४०-३/२०२० डी. दि. २४/०३/२०२० यांचेकडील सुचनेनुसार कोरोना विषाणू (कोव्हीड १९)चा प्रादूर्भाव रोखणेसाठी २१ दिवसाचा लॉकडाऊन देशभरात लागू केला आहे. सतेच प्रतिबंधात्मक उपायायोजना करणेसाठी या कार्यालयाकडून विविध मनाईआदेश व परिपत्रकाव्दारे प्रतिबंधक सुचना उपरोक्त संदर्भ क्र. १ ते ११ अन्वये निर्गमित करणेत आले होते.

**त्या अर्थी मी नवल किशोर राम, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, पुणे जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 व भारत सरकार,गृह मंत्रालय यांचेकडील आदेश क्र. ४०-३/२०२० डी. दि. २४/०३/२०२० अधिसुचना अन्वये उपरोक्त संदर्भिय नमुद व इतर सर्व आदेश व परिपत्रके यांना पुढील आदेश होईपर्यत मुदतवाढ देणेत येत आहे.**

या दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे

प्रति,
1) मा. केंद्रीय गृह सचिव, भारत सरकार नवी दिल्ली
2) मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
3) मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
4) मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर
5) मा. आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका
6) मा. पोलीस आयुक्त पुणे शहर व पिंपरी चिंचवड, पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण /मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,
7) सर्व संबंधित आस्थापना / कार्यालयीन प्रमुख

Scanned with CamScanner